महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व्यवसाय बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश इलेक्ट्रीकल सुपरवायजर, ऑटोमोबाईल मेकॅनिक, इलेक्ट्रीकल वायरमन, मोटारवायडींग, कॉम्प्युटर ऑपरेटर, कॉम्प्युटर हार्डवेअर प्रत्येकी एक वर्ष पात्रता दहावी / बारावी एसटी पास/ लायसन /जॉबची सोय. डिप्लोमा फॅब्रिकेशन, एसीमेकॅनिक, इलेक्ट्रीकल, ऑटोमोबाईल

पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट

राधीका रोड, सातारा मो. ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

निरामय पॅरालिसिस सेंटर

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर

किती ही जुने पॅरालिसिस असो, आयुर्वेदिक उपचार पध्दतीने १५ ते २० दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही ब्रेनचा कंट्रोल जाणे, वेडवर आहात? काळजी करु नका खात्रीशीर उपचार, १०० % गॅरंटी, आयुर्वेदिक तज्ज्ञांच्या निगराणीमध्ये.

शाखा क्र. १
मांजरी रेल्वे स्टेशन
हडपसर, पुणे

शाखा क्र. २
खंडोबा माळ रोड,
लोहगांव, पुणे

Contact: 9503310568

सोलापूर RNI No . MAHMAR 2006/17624 वर्ष १८ वे, अंक ०९ वा **शुक्रवार, दि. २१ जुलै २०२३** पाने ४ पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

Kai. Sushilatai Gaikwad Bahuddeshiya Sanstha's

BHARATRATNA INDIRA GANDHI COLLEGE OF ENGINEERING

BIGCE

◆ Solapur-Pune National Highway No.9, Gat No. 58-3, Kegaon, Solapur - 413 255 ◆ Email : ksgbs.bigcoe@gmail.com, Visit us on. www.bigce.in ◆

- **Approved by :** All India Council for Technical Education (AICTE), New Delhi.
- **Approved by :** Directorate of Technical Education (DTE) Maharashtra.
- **Affillated to** Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere.

DTE Institulte Code : EN 6219 **DIPLOMA ENGINEERING (POLYTECHNIC) COLLEGE - MSBTE CODE : 1663**

Pioneers

Chairman
Er. D. S. Gaikwad
B.E. (Civil)

Secretary
Er. R. D. Gaikwad
B.E. (INSTRU, M.B.A.)

Principal & Director
Dr. B. J. Patil
B.E., M.Tech., MBA, Ph.D., LMISTE, AM. Ae. Si.
Mob. : 9342458445

MECHANICAL
ENGINEER

MCA ADMISSION STARTED FOR ACADEMIC YEAR 2023

Courses Offered

B. Tech. Courses	Intake	Choice Code
Mechanical Engg.	54	621961210
Computer Science & Engg.	120	621924210
Electronic & Telecomm. Engg.	30	621937210
Civil Engg.	54	621919110
Bio-Medical Engg.	54	621946110
Electrical Engg.	30	621929310
PG. Course (M. Tech-WRE)	09	621919710

Courses Offered

Diploma Courses	Intake	Choice Code
Mechanical Engg.	30	621961220
Electrical Engg.	30	621929320

Newly Started P.G. Courses

Courses	Intake	Choice Code
Master of Computer Application (MCA)	60	621924110

100% Result
100% Placement Assistance

B.Tech. - CAP - Round - Option	Diploma 1st Year - CAP Round - Option	MCA - CAP Round - Option
- First Round - Dt.- 20/07/2023 to 22/07/2023	- First Round - Dt. - 23/07/2023 to 26/07/2023	- First Round - Dt.- 21/07/2023 to 23/07/2023
- Secound Round Dt. - 30/07/2023 to01/08/2023	- Second Round - Dt. - 06/08/2023 to 08/08/2023	- Second Round - Dt. - 31/07/2023 to 02/08/2023
- Third Round - Dt. -08/08/2023 to 10/08/2023	- Third Round - Dt. - 19/08/2023 to 22/08/2023	- Third Round - Dt. - 09/08/2023 to 11/08/2023

★ BIGCE's Special Features :

- ✓ Good Record of Placement
- ✓ Scholarship Facilities
- ✓ Digital Library Available
- ✓ Green Campus
- ✓ Hostel and Bus Facilities

★ We Offer

- ✓ Admission Process Guideline
- ✓ Doctorate and Experienced Faculty

Sucess
Dream
Goals
Learn
Work
Win

For Admission Contact

Dr. B. J. Patil	: 9342458445
Prof. Rani B. Patil	: 8197350162
Prof. N. A. Banda	: 8806554059
Mr. Shinivas Jog	: 9372008140
Sou. Vijaya Shivgonde	: 9890114822
Mr. R. G. More	: 9850766044

For MCA Admission Contact

Dr. Shivanand Pujar	: 8660651669
Prof. Somshankar Aland	: 8275458272
Prof. Rani B. Patil	: 8197350162
Prof. Arti Patel	: 9284207287

Option Form Fill Up at : Opp. Government Polytechnic, Near Gurram Hospital, Diddi Medical, OM NET Cafe Solapur.

संपादकीय

एनडीए विरुद्ध इंडिया!

लोकसभेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या सत्तारूढ आणि विरोधी आघाडीच्या बैठका आज पार पडल्या. दोन्ही बाजूंनी आपापल्या आघाड्यांमध्ये मोठा दम असल्याचे वातावरण निर्माण केले आहे. बंगळुरूला जमलेल्या दिग्गज राजकीय पक्षांच्या आघाडीने बऱ्याच बाबी निश्चित केल्या असल्याने त्यांच्यात एकजुटीने लढण्याची मानसिकता स्पष्ट दिसून आली आहे.

या आघाडीचे नावही निश्चित करण्यात आले आहे. 'इंडिया' असे कल्पक नाव या आघाडीला देण्यात आले आहे. 'इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्लुझिव्ह अलायन्स' या शब्दांचे संक्षिप्त रूप 'इंडिया' असे आहे. यापुढे ही काँग्रेसप्रणित आघाडी 'यूपीए' ऐवजी 'इंडिया' आघाडी म्हणून ओळखण्यात येईल. या आघाडीला नाव काय ठेवायचे यावर उपस्थितींनी बराच खल केला. त्यांना यूपीए हे नाव बदलायचेच होते. मग अनेकांनी अनेक प्रस्ताव सुचवले. त्या सगळ्यांच्या सूचना ऐकून राहुल गांधी यांनी ही 'इंडिया' नावाची संकल्पना मांडली. मुख्य म्हणजे सर्वांनीच त्याचे एकमुखाने स्वागत केले. या नावामुळे अनेक नेते अगदीच उत्साही झालेले दिसले.

ममतांनी तर 'एनडीए कॅन यू चॅलेंज इंडिया?' असे आव्हानात्मक उद्गार काढत आपल्यातला केवळ या नावावरून निर्माण झालेला उत्साह प्रकट केला आहे. यावेळी राहुल गांधी यांनी या नावाबाबत फिलॉसॉफिकल युक्तिवाद केला आहे. त्यांनी म्हटले आहे की, उद्याची जी लढाई असेल त्याला केवळ भाजप विरुद्ध विरोधक असे स्वरूप असणार नाही. ही लढाई दोन स्वरूपाच्या आयडिया ऑफ इंडियाची आहे. आज देशाचा आवाज दाबला जातो आहे. देशाला आज आवाज प्राप्त करून देण्याची ही लढाई असल्याने हे 'इंडिया' हे नाव निश्चित करण्यात आले आहे. अर्थात, हे जरी खरे मानले तरी अजून विरोधी आघाडीचे नेतृत्व कोण करणार, हा प्रश्न बाकीच आहे. संख्यात्मकदृष्ट्या काँग्रेसकडेच हे नेतृत्व असेल हे गृहीत आहे. पण काँग्रेसने मागे 2014 आणि 2019 च्या वेळी चूक केली होती तीच चूक याही वेळी केलेली दिसत आहे. काँग्रेसने आम्हाला सत्तेत किंवा पंतप्रधानपदात स्वारस्य नाही, असे नमूद केले आहे.

अर्थात त्यांना हे माहिती आहे की विरोधी आघाडी सत्तेवर आली की त्याचे नेतृत्व संख्याबळावर आपल्याकडेच येणार आहे. पण तसे आतापासूनच दाखवण्याची त्यांची तयारी नाही. मग अशा नेतृत्वहीन आघाडीच्या स्थिरतेविषयी लोकांच्या मनात शंका निर्माण होते आणि लोकांना हा बिननेतृत्वाचा पर्याय व्यर्थ वाटू लागतो, मग मतदार एकखांबी नेतृत्वाकडे म्हणजेच मोदींकडे वळतात, असे गेल्या दोन निवडणुकांतून दिसून आले आहे. त्याऐवजी विरोधी आघाडीचे नेतृत्व काँग्रेसच करेल आणि पंतप्रधान काँग्रेसचाच होईल, हे आधीच सर्वांनी दमदारपणे जाहीर केले असते तर ही आघाडी अधिक विश्वासार्ह होऊ शकली असती. पण गेल्या दोन निवडणुकांमध्ये जी चूक झाली तीच त्यांनी यानिमित्ताने पुन्हा केली आहे, असे दिसते आहे. अर्थात सन 2019 मध्ये विरोधकांमध्ये आघाडी निर्माण झाल्याचे चित्र निर्माण केले गेले असले तरी प्रत्यक्षात त्या निवडणुकांमध्ये सर्वच प्रमुख पक्ष एकमेकांच्या विरोधात लढले होते. त्यांच्यातील त्या वेळची एकी केवळ कागदावरच राहिली होती. यावेळी हा प्रकार टाळण्याचा विरोधी पक्षांचा प्रयत्न सकृतदर्शनी तरी यशस्वी झाला आहे, असे म्हणावे लागेल.

पंतप्रधान कोण होणार हाही प्रश्न त्यांनी गुलदस्त्यातच ठेवला आहे. नेतृत्वाच्या वादातून अपशकुन होऊ नये म्हणून बऱ्याच महत्त्वाच्या बाबी मागे ठेवून आधी एकतेला प्राधान्य देण्याचा हेतू यातून दिसून आला आहे. आता या आघाडीच्या समन्वयासाठी अकरा सदस्यांची समिती नेमली जाणार असून त्याचा अध्यक्ष आणि समन्वयक नंतर ठरवला जाणार आहे. आघाडीचे एक स्वतंत्र कार्यालयही दिल्लीत स्थापन केले जाणार असून बाकीच्या बाबींचा तपशील आता मुंबईत होणाऱ्या पुढील बैठकीत ठरणार आहे, असे आज जाहीर झाले आहे. या सगळ्या घडामोडी पाहिल्यानंतर या आघाडीतल्या पक्षांनी वाद निर्माण होईल, असे सगळे मुद्दे बाजूला टाकले आहेत. ही आघाडी पुढे नेमकी कशी वाटचाल करणार आहे हे मुंबईतील बैठकीनंतर स्पष्ट होणे अपेक्षित आहे. विरोधकांच्या या ऐक्याच्या पार्श्वभूमीवर भाजपनेही कंबर कसून आजच एनडीएची बैठक घेतली. त्यात 38 पक्षांचे कडबोळे एकत्र केले गेले आहे. यातील एकही पक्ष दमदार स्वरूपाचा नाही हे सगळ्यांनाच जाणवते आहे, पण त्यांच्याकडे 26 असतील तर आमच्याकडेही थोडेथोडके नव्हे तर तब्बल 38 आहेत हे दाखवण्याचाच अट्टहास यातून दिसून आला आहे. विरोधकांसाठी मोदी एकटेच भारी आहेत हा जो अविर्भाव भाजपच्या लोकांनी आजवर आणला होता त्याला त्यांनीच छेद दिला आहे हेही यातून दिसते आहे. त्यामुळे 26 जणांच्या कडबोळ्यात विरोधकांचे ऐक्य कसे साधणार आणि त्यांना देशाचा कारभार एकजुटीने कसा चालवता येणार असा युक्तिवाद करण्यात त्यांना मयार्दा येणार आहेत. कारण, भाजपप्रणित आघाडीचा कुणबा तब्बल 38 पक्षांचा असणार आहे. विरोधकांच्या आघाडीत जे पक्ष एकत्र आले आहेत त्यांची तब्बल 11 राज्यांमध्ये सत्ता आहे आणि त्यांची लोकसभेतील ताकद आजच दीडशे खासदारांची आहे. ही एकजूट भक्कम राहिली आणि त्यांनी एकदिलाने एकमेकांची साथ-संगत केली तर निश्चित ते भाजपप्रणित आघाडीला दमदार लढत देऊ शकतील, हे आज तरी निश्चित म्हणता येते. त्यामुळे एनडीएच्या बाजूने जायचे की इंडियाच्या बाजूने जायचे असा विचार जेव्हा मतदार करतील त्यावेळी ते निश्चितच इंडियाच्या बाजूने आपला कौल देतील, असा विरोधकांचा होरा आहे. आघाडीच्या नावाचे एक विधायक वलय निर्माण करण्यात त्यांना यश आले आहे. आता सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील सीमारेषा निश्चित झाल्या आहेत, पण पुढे हे राजकारण कसे वळण घेणार यावर बरेच काही अवलंबून आहे. मोदी-शहांची जोडी आपल्या हातून सहजासहजी सत्ता जाऊ देणार नाही, याचीही अनेकांना कल्पना आहे. त्यामुळे पुढील आठ-दहा महिन्यांचे राजकारण अधिकच रंगतदार असणार आहे.

निसर्गाची अवकृपा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाच्या लहरीपणा वाढत चालला आहे निसगार्चा लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसर्गाचा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा ना जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसगार्चा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसगार्ची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसगार्तील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वाथार्मुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसगार्चा लहरीपणा वाढला आणि निसगार्ने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वर्गाने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसगार्ची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

सिव्हील हॉस्पिटल येथे तत्काळ सिटीस्कॅनची सोय करा - आ. प्रणिती शिंदे

मुंबई (कटूसत्य वृत्त):- विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत आमदार प्रणिती शिंदे यांनी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे सिटीस्कॅन मशीन तात्काळ बसविण्याबाबत पाईट ऑफ इन्फॉरमेशन या आयुदा द्वारे प्रश्न उपस्थित केला.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे गेल्या 6 महिन्यापासून सिटीस्कॅन मशीन बंद आहे. याबाबत वारंवार मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधेद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे बैठक घेतली असता ते म्हणत आहेत. आम्ही टेंडरवर सिव्हील हॉस्पिटल येथे आऊट सोर्सने सुरु करू. खाजगी रुग्णालयात सिटीस्कॅन करण्याकरीता 1200 ते 1400 रुपये घेतले जाते. सिव्हील हॉस्पिटल येथे कमीत कमी दरामध्ये किंवा मोफत सिटीस्कॅन केले जाते.

सोलापूर शहर-जिल्हा व सभोवतालच्या जिल्ह्यातून तसेच शेजारील कर्नाटक, आंध्र व इतर राज्यामधून बहुसंख्य गोर-गरीब रुग्ण उपचाराकरीता येत असतात. परंतू रुग्णालयामधील सिटीस्कॅन मशीन, एम.आर.आय. मशीन बंद असल्यामुळे आमदार प्रणिती शिंदे यांनी वारंवार शासनाकडे व मंत्री महोदय यांच्याकडे मागणी केली, परंतू सिटीस्कॅनची सुविधा अद्याप सुरु झालेले नाही. रुग्णांची खाजगी हॉस्पिटलमध्ये आर्थिक पिळवणुक केली जाते. यामुळे रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच रुग्णांची कौटुंबिक परिस्थिती हलाकीची असल्यामुळे ते खाजगी रुग्णालयात सिटीस्कॅन करू शकत नाहीत.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथे तात्काळ सिटीस्कॅन मशीनची सोय करण्यात यावी अशी मागणी आमदार प्रणिती शिंदे यांनी अधिवेशनामध्ये केली.

संत चोखामेळा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.आप्पासाहेब पुजारी यांची निवड

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- संत चोखामेळा अध्यासन केंद्र पुणे व वृंदावन फाऊंडेशन आयोजित संत चोखामेळा साहित्य संमेलन 2023 च्या अध्यक्षपदी मंगळवेढा येथील संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. आप्पासाहेब पुजारी यांची निवड करण्यात आली आहे.

चोखामेळा साहित्य संमेलन 2023 नियोजनाबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील संत तुकाराम अध्यासन केंद्र येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या अध्यक्ष प्राचार्या उल्काताई धावारे चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम - संत ज्ञानेश्वर - संत नामदेव अध्यासनाचे समन्वयक प्रो.डॉ.ओम श्रीश दत्तोपासक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत संत चोखामेळा महाराज व परिवारातील संताच्या साहित्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी संत चोखामेळा साहित्य संमेलन घेण्यासंदर्भात चर्चा होऊन पुण्यभूमी आळंदी या ठिकाणी हे साहित्य संमेलन घेण्याचे नियोजित करण्यात आले. या साहित्य संमेलनाचे पहिले





अध्यक्ष म्हणून संत साहित्याचे गाढे अभ्यासक, संत चोखामेळा व परिवारातील संताच्या अभंगाचे संशोधक चारित्रलेखक प्राचार्य डॉ. आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा) यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.

प्राचार्य डॉ.आप्पासाहेब पुजारी यांनी संत चोखामेळा यांच्या दुर्मीळ अभंगाचे संपादन केले असून या साहित्याचा प्रदीर्घ अभ्यास केला आहे. हे दोन दिवसीय साहित्य संमेलन एकूण सहा सत्रात विभागून होणार असून महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील नामवंतांच्या उपस्थितीत आळंदी येथे 18 व 19 नोव्हेंबरला संपन्न होणार आहे.

या साहीत्य संमेलनात परिसंवाद, चर्चासत्र, संत साहीत्य प्रदर्शन, उद्बबोधन व संत साहित्याचे देखावे असणार आहेत. तसेच संत चोखामेळा व सोयराबाई यांच्या साहित्यातील श्रीविठ्ठलभक्ती असा मध्यवर्ती आशय घेउन विशेष अंक ही प्रकाशित करण्यात येईल.

याप्रसंगी संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे संस्थापक सचिन पाटील, प्राचार्य डॉ. आप्पासाहेब पुजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ.संदीप सांगळे, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.माणिकराव सोनवणे, महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीचे सदस्य ॲड.प्रणव पाटील, कवयित्रीलका सपकाळ, वृंदावन फाऊंडेशन समन्वयक वल्लभ केनवडेकर, प्रा.विनोद सूर्यवंशी, संमेलन समितीचे निमंत्रक प्रा.सोमनाथ लांडगे आदी उपस्थित होते.

सोलापुरात रविवारी निमातर्फे 'प्लॅटिनो निमाकॉन मेडीलॉज २०२३' कॉन्फरन्स

विविध पुरस्काराचे होणार वितरण !

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन "निमा" सोलापूर शाखेच्या वतीने रविवार दिनांक २३ जुलै रोजी हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे वैद्यकीय क्षेत्रातील कायदेविषयक प्लाटिनो निमाकॉन मेडीलॉज २०२३ या विभागीय एक दिवसीय कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती निमाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर विनायक टेंभुर्णीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कॉन्फरन्ससाठी सर्व पॅथीचे हजाराहून अधिक डॉक्टर्स उपस्थित राहणार असून रविवारी सकाळी नऊ ते सायंकाळी ५ पर्यत वैद्यकीय क्षेत्रातील विविध कायदेतज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. वैद्यकीय प्रॅक्टिस करीत असताना डॉक्टरांना प्रचलित कायद्यांचे अद्ययावत ज्ञान असणे गरजेचे आहे. कोरोना महामारी नंतर एकूणच जगामध्ये बदल घडून आला आहे. त्यानुसार बदललेले कायदे लक्षात घेऊन प्रॅक्टिस करणे आवश्यक आहे. शिवाय इंटिग्रेटेड मेडिकल प्रैक्टिशनर यांचे अधिकार व मयार्दा, वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक अशी कागदपत्रे, त्यांचे रेकॉर्ड कसे ठेवावे? विविध सर्टिफिकेटस देताना नेमकी काय काळजी घ्यावी? ग्राहक संरक्षण कायद्यात नवीन समाविष्ट बाबी, अवयव प्रत्यारोपण करताना लक्ष्यात घेण्यायोग्य कायदेशीर बाबी या सर्व गोष्टींचा उहापोह या चर्चासत्राच्या दरम्यान होणार आहे. त्यासाठी या क्षेत्रातील कायदे तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

यावेळी डॉ. ज्योती भाकरे, डॉ. राजेंद्र खटावकर, डॉ. निशिगंध जाधव, डॉ. मुजाहिदन पठाण, डॉ. नीलरोहित पैके, डॉ. धनंजय कुलकर्णी, डॉ. नितीन कोथळे, डॉ. आसिफ शेख व प्रसिद्ध मेडिको लिगल कन्सल्टंट डॉक्टर अरुण मिश्रा, सोलापूर महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर हे मार्गदर्शन करणार आहेत.

सर्व इंटिग्रेटेड मेडिकल प्रैक्टिशनर यांनी सदर कॉन्फरन्स ला उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर विनायक टेंभुर्णीकर यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. रविराज गायकवाड, डॉ. नितीन बलदवा, डॉ. धनंजय कुलकर्णी, डॉ. अमोल माळगे, डॉ. सचिन बोंगरगे, नागनाथ जिड्डीमनी, डॉ. प्रवीण ननवरे आदी उपस्थित होते.

यांचा होणार पुरस्काराने गौरव !

कॉन्फरन्सच्या सुरुवातीला उद्घाटनावेळी सकाळी 9 वाजता निमा सोलापूर शाखेतर्फे विविध पुरस्काराने डॉक्टरांचा सन्मान करण्यात येणार आहे. डॉ. रमाकांत अयाचित यांची " निमारत्न" पुरस्कारसाठी तर ॲलोपॅथी चिकित्सा पद्धतीमध्ये उत्कृष्ट कार्य करणारे डॉ. प्रदीप जोशी व मिश्र चिकित्सा पद्धतीमध्ये उत्तम कामगिरी करणारे डॉ. शफी मणियार यांची प्रतिष्ठित अश्या "धन्वंतरी पुरस्कार" साठी निवड करण्यात आली आहे. याशिवाय वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करून संघटनेस बळ देणारे "निमास्टार" म्हणून डॉ. किरण देशमुख व डॉ. शिवशंकर खोबरे यांची "निमा सुपरस्टार", डॉ. चंद्रशेखर बिराजदार व डॉ.फैज बांगी यांची "निमा शायनिंग स्टार", डॉ. अक्षय गांधी व डॉ. अमित कोठनाळ यांची "निमा रायझिंग स्टार" म्हणून निवड करण्यात आली आहे, अशी माहिती निमा संघटनेच्या सोलापूर शाखेचे सचिव डॉ. सचिन बोंगरगे यांनी दिली.

मणिपूर मधील महिलांवरील अत्याचार आणि हत्या विरोधात आम आदमी पार्टीची राज्यभर निदर्शने

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मणिपूर मधील परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडत चालली आहे, मणिपूरमध्ये कुकी समाजातील दोन महिलांची नग्न अवस्थेत दिंड काढून त्यांची हत्या करण्यात आली आहे, हा संघर्ष मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू आहे जवळपास तीन महिन्याचा कालावधी झाला असूनही केंद्र भाजपा सरकार तेथील परिस्थितीवर नियंत्रण मिळू शकला नाही आहे, आत्तापर्यंत 140 लोकांनी आपला जीव गमावला आहे.

मनिपुर मधील दोन महिलांवरील अत्याचाराची घटना खूप संवेदनशील आणि विचलित करणारी आहे, परंतु देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महिला बालकल्याण मंत्री स्मृती ईराणी यांनी अजूनही मणिपूर बाबत आपल्या तोंडातून एकही शब्द काढलेला नाही,

पंतप्रधान सर्व जग फिरता आहेत परंतु मणिपूरला गेले नाहीत हा असंवेदनशीलपणा पंतप्रधानाला शोभत नाही, मणिपूरचे मुख्यमंत्री यांनी अजूनही कुठलीही ठोस कार्यवाही केलेली नाही त्यामुळे तेथील जनता घाबरलेली आहे, भाजपाने देशात डर का मोहोल असे वातावरण तयार केले आहे, आज देश्यात भाजपाचे नेते मंत्री सोडून कुणीही सुखी नाहीं, अशा सरकारला पदावर राहण्याचा कुठलाही नैतिक अधिकार नाही.

मणिपूरच्या हिंसाचारा संदर्भात आम आदमी पार्टीने राज्यात सर्व जिल्ह्यात तीव्र निदर्शने केली आहेत, केंद्र भाजपा सरकारने लवकरच मनिपुरची परिस्थीती नियंत्रणात आणावी आणि तेथील जनतेला भयापासून मुक्तता द्यावी तसेच महिलांवरील अत्याचारांची तात्काळ चौकशी करून फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरण चालवून दोषींना कडक शिक्षा करावी अशी मागणी आम आदमी पार्टी सोलापूर ने केली आहे व पूनम गेट, जिल्हापरिषद येथे जोरदार निदर्शने करण्यात आले.

जैन मुनी हत्येच्या निषेधार्थ माढ्यात जैन समाजाचा मूक मोर्चा

माढा (कटूसत्य वृत्त):- कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी येथील आचार्यश्री १०८ कामकुमारनंदी महाराज यांच्या हत्येच्या निषेधार्थ माढ्यात मूक मोर्चा काढण्यात आला. शहरातील सकल जैन समाजाच्या वतीने एकत्रित येऊन जैन मंदिरा पासुन मोचार्ला सकाळी १० वाजता सुरुवात झाली. शहरातील कसबा पेठ, झेंडे गल्ली,छत्रपती शिवाजीमहाराज चौक मार्गे इंदिरा गांधी चौकातून तहसील कार्यालयासमोर मोर्चा आला. जैन समाजाच्या वतीने मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी विशाल शहा यांनी मनोगतातून घटनेचा निषेध नोंदवला. या मोर्चात महिलांनी देखील मोठा सहभाग नोंदवला. तहसील प्रशासनाच्या वतीने निवेदन स्वीकारण्यात आले.

भाजप अध्यक्ष नरेंद्र काळे यांचा खड्डा तालीमतर्फे जंगी सत्कार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- भारतीय जनता पार्टीच्या शहर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नरेंद्र काळे यांचा खड्डा तालीम श्री शिवजन्मोत्सव मंडळातर्फे भव्य सत्कार करण्यात आला. सत्कारासाठी क्रेनने मोठा हार आणण्यात आला होता. त्यावर शहर अध्यक्ष अशी अक्षरे फुलांनी सजवली होती. यावेळी ढोल ताशांच्या गजरात भाजप कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. याप्रसंगी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. तसेच मिठाई भरवून नूतन शहर अध्यक्ष नरेंद्र काळे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

शिवकुमार कामाठी, माजी नगरसेवक रविसिंह कैय्यावाले, राजू जमादार, महेश खानोरे, वैभव परदेशी, बाळासहेब भोसले, संतोष अलदी, संतोष जेडगे, स्टेफन स्वामी, विशाल शिंगे, पवन पुल्ली, विजय म्हेत्रे, महेश तलाटी, सागर भागानगरे, सुमित झंपले, आनंद चौगुले, आकाश कुलकर्णी, मनोज चव्हाण, राजकुमार पाटील, अतिश येळणे, कृष्णा सुरवसे, अमोल गायकवाड, अजय शिंदे, समर्थ गुजले, आकाश बनसोडे आदींसह खड्डा तालीम श्री शिवजन्मोत्सव मंडळाचे सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

गोंधळात गोंधळ

राजकारणात खरंच
सांगा कोण साव आहे...
दाखवले जाते भलतेच
नि आतून वेगळाच डाव आहे...
आघाडीची युती आहे की
युतीची आघाडी आहे...
गोंधळून गेली जनता सारी
कोण असली गडी आहे...

हणमंत पडवळ,
उस्मानाबाद,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

व्ही व्ही अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी बनविले कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारित प्रकल्प

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आजचे युग हे संगणकाचे युग असून प्रत्येक ठिकाणी संगणकाच्या आधारे काम केले जाते. तंत्रज्ञानाच्या मदतीने माऊसच्या वापराशिवाय संगणक हाताळू शकतो हे व्हीव्हीपी अभियांत्रिकीच्या संगणक शास्त्र शाखेचे विद्यार्थी महेश गोडगे, वैष्णवी खत्री, किरण कदम व प्रशांत चव्हाण यांनी प्रा. अश्विनी मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केले आहे. कॉम्प्युटर मॉनिटर यामध्ये बघून आपण कॉम्प्युटर हाताळतो व माऊसच्या सहाय्याने हवी ती माहिती मॉनिटरवर करू शकतो. या प्रक्रियेमध्ये माऊस हे उपकरण भौतिक पद्धतीने कार्य करीत असतो परंतु माऊसशिवाय तंत्रज्ञानाचा वापर करून संगणक चालविता येईल हे शक्य केले आहे. या तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थी चमुनीं अधिक माहिती दिली की मानवी हाताच्या हावभावांनी स्क्रीनवर कर्सर इच्छित स्थळी हलवू शकतो त्याचबरोबर ए आय तंत्रज्ञानाच्या मदतीने फेस डिटेक्शन व व्हॉइस असिस्टंट अर्थात अनुक्रमे चेहरा ओळखणारे व आवाज ओळखणारे सहायकांची निर्मिती केल्यामुळे संगणक क्षेत्रात या नवीन प्रकल्पामुळे संगणक निर्मात्यांना संगणकाची नवी मालिका बाजारपेठेत उपलब्ध करून देण्याची संधी मिळेल असा आशावाद व्यक्त करून माफक खर्चामध्ये प्रकल्प निर्मिती केल्याची माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश मुगळे, संगणक शास्त्राचे विभाग प्रमुख प्रा. व्ही. व्ही. पालमूर व मार्गदर्शक प्रा. अश्विनी मोटे यांच्या उपस्थितीत प्रकल्प निर्मिती चमुने आपल्या संशोधनाची यशस्वी चाचणी पार पाडली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. देशमुख, संस्थापक सचिव अमोल (नाना) चव्हाण व संस्था संचालक मधुकर कटकधोंड यांनी संशोधक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

सोलापूर सिंहगडाच्या ७८ विद्यार्थ्यांची परदेशी भाषेच्या प्रशिक्षणासाठी निवड

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- केगाव येथील एन.बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील ७८ विद्यार्थ्यांची परदेशी भाषेच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली असून यामध्ये ३० विद्यार्थ्यांची जापनीज भाषेसाठी, २४ विद्यार्थ्यांची इटालियन भाषेसाठी, २४ विद्यार्थ्यांची स्पॅनिश भाषेसाठी निवड झाली असल्याचे सिंहगड अभियांत्रिकी महाविद्याल याचे प्राचार्य डॉ.शंकर नवले यांनी सांगितले. यामध्ये कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभाग, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग विभाग, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभाग, मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभाग, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश असून अशा ७८ विद्यार्थ्यांची 'असेंचर' कंपनीमध्ये आवश्यक असलेल्या भाषेच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. या निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षात ऑनलाईन माध्यमातून स्पॅनिश, इटालियन, जापनीज प्रशिक्षण मिळणार आहे. यामुळेच विद्यार्थ्यांना अंतिम वर्षात शिकत असतानाच चांगल्या पगाराच्या नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. या यशाबद्दल सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ.रवींद्र व्यवहारे व डॉ.शेखर जगदे, डॉ.प्रदीप तपकीरे, डॉ.दत्ता त्रय गंधमल, डॉ.विनोद खरात, प्रा.विजयकुमार बिरादार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे, सिंहगड पब्लिक स्कूलच्या प्राचार्या निकत शेख व तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मच्याऱ्यांनी अभिनंदन केले.

महालिंगराया हायस्कूल हुलजंती येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

ग्रामपंचायत सदस्य मारुती पेटर्गे यांचा स्तुत्य उपक्रम : दोनशे दहा विद्यार्थ्यांना लाभ

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- समाजातील विविध सामाजिक संस्थेने सामाजिक दायित्व स्वीकारत चला आरोग्य सुधारूया सारखे उपक्रम राबवावे .जेणेकरून लोकांच्यात जनजागृती होईल .वेळीच आजारावर उपचार करणे शक्य होईल.ज्या समाजात जन्माला आलो त्यांचं आपण काहीतरी देणं असतो . विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणीमुळे आपल्या आरोग्याची माहिती मिळते या उद्दात्त हेतूने आरोग्य शिबिर हा उपक्रम घेण्यात आला आहे.असे प्रतिपादन हुलजंती ग्रामपंचायतचे सदस्य तथा युवा नेते मारुती पेटर्गे यांनी केले. श्री महालिंगराया हायस्कूल हुलजंती (ता. मंगळवेढा)या प्रशालेत त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी घेण्यात आली यावेळी ते बोलत होते. या मोफत आरोग्य शिबिरा उद्घाटन प्रसंगी श्री संत दामाजी साखर कारखान्याचे माजी संचालक यादप्पा माळी सावकर,श्री पाटील हॉस्पिटल उमदी चे डॉ राहुल पाटील, उद्योजक कामानंद हेकडे,शिवानंद कुरमुत्ते, माजी सरपंच मधुकर गंगमई, माजी सरपंच लक्ष्मण पेटर्गे, ग्रामपंचायत सदस्य बिराप्पा कोटे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ स्वाती जामदार, उपाध्यक्ष रसूल आत्तार,भाजपा युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष नागेश कनशेट्टी,महादेव पेटर्गे, हिम्मतराव पेटर्गे, माजी ग्रामपंचायत सदस्य सुखदेव डोळ्ळे, ग्रामपंचायत सदस्य बिराप्पा येडडे, दादासाहेब सोनवले, युवा नेते सुरेश पेटर्गे, महेश पेटर्गे, जकराया पेटर्गे, शंकर पेटर्गे, आरोग्य विभागाच्या बिराजदार मॅडम, व महालिंगराया हायस्कूलचे शिक्षक, शिक्षकेतर, विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते.

दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांची तपासणी

विद्यार्थ्यांना आपले रक्त ग्रुप, हिमोग्लोबिन, कर्ण दोषाची माहिती, व मेडिसिन देण्याची व्यवस्था ग्रामपंचायत सदस्य मारुती पेटर्गे यांनी केली होती. 210 विद्यार्थ्यांनी या आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. त्याकरीता सहकार्य श्री पाटील हॉस्पिटलचे डॉ. राहुल पाटील यांचे लाभले. या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

वृक्षारोपण कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी यांना निमंत्रण देणार- माजी नगरसेवक सत्यवान देशमुख

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- मोहोळ शहरातील महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या तहसिल, पोलीस स्टेशन, बांधकाम विभाग,भूमी अभिलेख, नगर परिषद, पंचायत समिती, रजिस्टर ऑफिस कार्यालयाकडे शहरासह तालुक्यातून वयोवृद्ध,दिव्यांग, विद्यार्थी, नागरिक कामानिमित्त या कार्यालयास येतात परंतु सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने पावसाच्या पाण्याने तहसील आवारामध्ये भले मोठे खड्डे पडल्याने नाहक त्रास होत आहे वारंवार मागणी करून देखील सर्वच अधिकारी, लोकप्रतिनिधी, आंदोलन करते, सामाजिक राज्यकर्ते स्वतःचार चाकी गाडीमध्ये राजथाटात ये-जा करत आल्याने दुर्लक्ष करत आहेत त्या खड्डयामध्ये वृक्षरोपणाचा कार्यक्रम जाहीर करून वृक्षारोपण कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी यांना निमंत्रण पत्रिका देणार असल्याचे माजी नगरसेवक सत्यवान देशमुख व पोलीस मित्र संघटना नई दिल्ली भारत सोलापूर जिल्हा सचिव जीवराज गुंड पाटील यांनी मोहोळ तहसिल कार्यालय नायब तहसिलदार सुधाकर धायजे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले.

या वृक्षारोपण कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी मोहोळ नगर परिषद, बांधकाम विभाग, दुय्यम निबंध, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांना निमंत्रण पत्रिका देऊन उपस्थित राहण्याचे आवाहन करुन त्यांच्या उपस्थितीमध्ये शहरासह तालुक्यातील जनतेच्या साक्षीने हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम मोठ्या थाटात पार पाडणार माजी नगरसेवक सत्यवान देशमुख व पोलीस मित्र संघटना नई दिल्ली भारत सोलापूर जिल्हा सचिव जीवराज गुंड पाटील यांनी सांगितले.

ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली सोलापूर जिल्हास्तरीय कार्यशाळा/प्रशिक्षण संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या वतीने आज दिनांक 20 जुलै, 2023 रोजी सकाळी 11 ते 4 यादरम्यान ग्रंथालय अनुदान व्यवस्थापन प्रणाली प्रशिक्षण श्री हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर येथे आयोजित करण्यात आले होते. सोलापूर जिल्ह्यातील सर्व अकरा तालुक्यातील तालुका ग्रंथालयाचे ग्रंथपाल व तालुक्यातील प्रत्येकी पाच संगणक तज्ञ प्रतिनिधी तसेच जिल्हा ग्रंथालय संघाचे पदाधिकारी असे एकूण 60 प्रतिनिधींनी या प्रशिक्षणात सहभाग नोंदवला.या कार्यशाळेस जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, तांत्रिक सहाय्यक प्रमोद पाटील, वरिष्ठ लिपिक प्रदिप गाडे, यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सांगोला तालुक्यातून रणजित भंडारे, संजय सरगर, दत्तात्रय पाटील ,औंदुबर काळे, शरद कोळवले, रमेश कोकरे, अमर कुलकर्णी, आदी ग्रंथालय प्रतिनिधी उपस्थित होते.

महाज्योतीच्या 20 प्रशिक्षणार्थ्यांची विक्रिकर सहाय्यक पदी निवड; राहुल विजय जेंगठे राज्यात पहिला

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- माहात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेच्या एम.पी. एस.सी परीक्षा प्रशिक्षणातून 20 विदयार्थ्यांची विक्रिकर सहाय्यक पदी निवड झालेली आहे. यात 14 इतर मागास वर्ग, 5 विमुक्त जाती-जमाती, 1 विशेष मागास प्रवगार्तील विदयार्थ्यांचा समावेश आहे.

माहात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेमार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जमाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवगार्तील विदयार्थ्यांना राज्यात तसेच केंद्र शासनात सेवेची संधी प्राप्त व्हावी या करीता एम.पी. एस.सी परिक्षा प्रशिक्षण योजना राबविण्यात येते. या योजनेतर्गत विदयार्थ्यांच्या आर्थिक तसेच शैक्षणिक गरजा लक्षात घेता विदयावेतनही पुरविले जाते.

यशस्वी उमेदवारांमध्ये राहुल जेंगठे, गायत्री गलखे, पियुष डोंगरे, मारूति शेंदगे, रूपाली खाडे, जलिंदर कसार, पोपट करांदे, सत्यजित साबळे, संतोष अंबुले, ऋतुजा मसाळ, आविनाश वाघमारे, मयुर लोणकर, परेश भावसार, स्वाती डोंगरे , मयुर देवरे, जगदिश केदार, हरिश शिंदे , वैभव नन्नवरे, रिंकल हडके, प्रशांत बोरकुट या विदयार्थ्यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे यातील राहूल जेंगठे हा विदयार्थी राज्यात पहिला आला आहे. राहूलने आपल्या या यशाचे श्रेय आपल्या पालकासोबत महाज्योतीला,व महाज्योतीच्या प्रशिक्षक वगार्ला तसेच प्रशिक्षणा दरम्यान दिल्या जाणाऱ्या विदयावेतनाला दिलेले आहे.

वर्ष 2020-21 या आर्थिक वर्षात इतर मागास वर्ग, विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवगार्तील विदयार्थ्यांसाठी एमपीएससी परिक्षा प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेत सहभाग घेण्यासाठी जाहिरतीच्या माध्यामातून नॉनक्रिमिलेअर उत्पन्न गटातील विदयार्थ्यांकडून महाज्योतीच्या संकेत स्थळावरून अर्ज मागविण्यात येतात. पात्र विदयार्थ्यांना एम.पी. एस.सी. परीक्षा प्रशिक्षण योजनेत सहभाग दिला जातो.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी सर्व उर्तीर्ण विदयार्थ्यांचे अभिनंदन केले. राहुल जेंगठे या विदयार्थ्यार्चे विशेष कौतुक केले. विदयार्थ्यांनी एम.पी.एस.सी. परिक्षा प्रशिक्षण योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले नागपूर यांनी केले आहे.

विक्रिकर सहाय्यक पदी राज्यात पहिला आलेला राहुल विजय जेंगठे या विदयार्थ्याचे मनोगत

घरी दोन एकर भात शेती. त्यावर आमच्या कुटुंबाची गुजरबसरन चालते. माझे शालेय शिक्षण जिल्हा परिषेदेच्या शाळेत झाले. सिंदेवाही तालुक्यात बी.ए.केले. शिक्षणात गोडी वाढली. तसे स्वप्न मोठे होऊ लागले. स्पर्धा परिक्षेचा अभ्यास सुरू केला. महाज्योतीच्या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण योजनेत सहभाग घेतला. प्रशिक्षाणादरम्यान विदयावेतनाचा लाभ मिळाला. शैक्षणिक आणि इतर दैनंदिन खर्च उचलला गेल्यामुळे निश्चिंत मनाने अभ्यास करता आला. यशस्वी होता आले. आज मी विक्रिकर सहाय्यक पदी राज्यात पहिला आलेलो आहे. हे प्रामाणिक प्रयत्नांचे यश आहे. पालकांच्या मेहनतीचे आणि महाज्योती विदयार्थ्यांसाठी राबवत असलेल्या प्रयत्नांचे यश आहे.

टेंभुर्णी येथे 'जैन साधू हत्या' प्रकरणी सकल जैन समाजाचा रेबीन बांधून मुक मोर्चा

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- कर्नाटक राज्यातील चिक्कोडी (बेळगाव) जवळील हिरेकोडी येथील जैन दिगंबर साधू श्री १०८ कामकुमारनंदी महाराज यांचे अपहरण करून करण्यात आलेल्या निर्घृण हत्याकांडातील आरोपीस कठोर शिक्षा व्हावी या मागणीसाठी टेंभुर्णीत जैन धर्मीय समजाच्या वतीने गुरुवारी सकाळी मोर्चा काढण्यात आला.

करमाळा रोड येथील अजितनाथ दिगंबर जैन मंदिर येथून मोचार्चे आयोजन करण्यात आले होते.हा मोर्चा करमाळा चौकातून महामार्गाने थेट पोलीस ठाण्यात नेण्यात आला. यावेळी मदन शहा यांनी या निर्घृण खुनाच्या घटनेचा निषेध करीत देशात अशा घटना वाढत आहेत.जैन साधू ही सुरक्षित नाहीत ही चिंतेची बाब आहे असे म्हटले.सरकारने या घटनेतील आरोपींना कठोर शासन देऊन संदेश दिला पाहिजे.तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी शासनाने योग्य ती काळजी घेतली पाहिजे अशी जोरदार मागणी केली.

टेंभुर्णी पोलीस स्टेशन
निषेध

यावेळी स्वेतांबर जैन समाज अध्यक्ष विकास कोठारी, अजिनाथ दिगंबर जैन मंदिर अध्यक्ष मनिष व्होरा,आदिनाथ दिगंबर जैन मंदिर अध्यक्ष वीरकुमार शहा यांच्यासह महेश कोठारी, विजयकुमार कोठारी, सुरज देशमुख, रामलाल ओसवाल, वैभव सोनिग्रा, डॉ.संजय दोशी, संदेश गांधी, वीरांग मेथा, हर्षल दोशी, संदीप दोशी, महेश कोकीळ यांच्यासह टेंभुर्णी, भिमानगर, बेंबळे, शिराळ (टें) येथील समाजबांधव, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागण्यांचे निवेदन मंडल अधिकारी सुजित शेळवणे, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के यांनी स्वीकारले.

Classified - छोटी जाहीरात

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी
सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी,
वाळवी, डास, जाळी,
माशी, ढेकुण, उंदीर,
घुस इ. नियंत्रण

नका कॅन्सरला
आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता +
नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा
नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोनः 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501%
रिझल्ट

R.K कन्स्ट्रक्शन्स
इं. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

निर्मल
व्यसनमुक्ती केंद्र
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, नागाळा पार्क (कोल्हापूर).**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

टी शर्ट चा कारखाना
सर्व शाळेसाठी लागणारे स्पोर्ट युनिफॉर्म तयार करुन मिळतील
फुल कलर सब्लीमेशन प्रिंटींग नवीन ३६ इंची मशीनवर टिशर्ट तयार करुन मिळतील.
ललित
डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड ,नगर पालिके समोर, बार्शी
9552020184,9028429227

शासन आपल्या दारी उपक्रमासाठी निवडलेल्या लाभार्थ्यांची माहिती विहित प्रपत्रात सादर करावी -उपजिल्हाधिकारी देशमुख

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- शासन आपल्या दारी या उपक्रमाचा जिल्हास्तरीय मुख्य शासकीय कार्यक्रम लवकरच होणार आहे. या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने प्रत्येक विभागाला शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांची निवड करून त्याची यादी प्रशासनाला सादर करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. त्यानुसार सर्व संबंधित विभागानी दिनांक 15 मे ते 30 जून पर्यंत निवडलेल्या लाभार्थ्यांची माहिती शासनाकडून देण्यात आलेल्या विहित प्रपत्रात ताातक ाळ सादर करावी, असे निर्देश उपजिल्हाधिकारी (रोहयो) चारुशीला देशमुख यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित शासन आपल्या दारी पूर्वतयारी आढावा बैठकीत उपजिल्हाधिकारी समिती देशमुख मार्गदर्शन करत होत्या. यावेळी तहसीलदार अंजली कुलकर्णी, कृषी उप संचालक राजकुमार मोरे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत नाशिककर, अन्य विभागाचे प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती देशमुख पुढे म्हणाल्या की, प्रत्येक विभागाने शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे. तसेच दिनांक 15 मे ते 30 जून 2023 या कालावधीत विविध शासकीय योजनांचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची यादी तयार करावी. यामध्ये लाभार्थ्यांचे संपूर्ण नाव, मोबाईल क्रमांक व कोणत्या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे व अनुषंगिक विषयाची माहिती प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या विहित प्रपत्रात भरावी असे त्यांनी सूचित केले.

विविध विभागाच्या जिल्हास्तरीय प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त सर्व तालुकास्तरीय कार्यालयाकडून लाभार्थ्यांची माहिती घेऊन ती एकत्रित करून प्रशासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे. ही माहिती दिनांक 15 ते 30 जून 2023 या कालावधीत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या शासकीय योजनेच्या लाभाच्या अनुषंगाने असावी. तसेच या उपक्रमाचा कालावधी 31 ऑगस्ट 2023 पर्यंत करण्यात आलेला असून सर्वेक्षण कालावधीत प्रलंबित असलेल्या लाभार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ देण्यात आला असेल तर त्या लाभार्थ्यांची नावेही द्यावीत, असे श्रीमती देशमुख यांनी सांगितले.

यावेळी उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत सर्व जिल्हास्तरीय यंत्रणेच्या कामाचा आढावा घेतला व मार्गदर्शक सूचना दिल्या. तर तहसीलदार अंजली कुलकर्णी यांनी शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत प्रत्येक विभागाने करावयाच्या कामकाजाची माहिती दिली. तसेच हा कार्यक्रम लवकरच होणार असल्याने सर्व संबंधित विभागांनी लाभार्थ्यांची माहिती प्रशासनाला द्यावी असेही त्यांनी आवाहन केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कबड्डी स्पर्धेचे आयोजन

माजी नगरसेवक किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या संयुक्त विद्यमानाने 22 जुलै ते 25 जुलै 2023 दरम्यान आयोजित

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य खुला गट पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा 2023 सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने इच्छा भगवंताची मंडळ व सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या संयुक्त विद्यमानाने 22 जुलै ते 25 जुलै 2023 दरम्यान आयोजित करण्यात आल्याची माहिती किसन जाधव यांनी दिली.

शंकर भवन मंगल कार्यालय उदय विकास शाळेच्या समोर लिमेवाडी सोलापूर या ठिकाणी सोलापूर जिल्हास्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत आकर्षक रोख बक्षिसे व अजित दादा चषक असे ठेवण्यात आले आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त संघाने या स्पर्धेत भाग घेऊन बक्षिसाचे मानकरी व्हावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

पुरुष गटासाठी प्रथम क्रमांकासाठी 20063 रुपये रोख व चषक, द्वितीय क्रमांकासाठी पंधरा हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकासाठी दहा हजार रुपये व चषक तसेच महिलांसाठी प्रथम क्रमांकासाठी सात हजार रुपये रोख व चषक, द्वितीय क्रमांक साठी पाच हजार रुपये व चषक तसेच उत्कृष्ट पक्कड़ 1000 रुपये रोख उत्कृष्ट चढाईसाठी एक हजार रुपये असे आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

या स्पर्धेचे उद्घाटन दिनांक 22 जुलै 2023 रोजी सायंकाळी पाच वाजता होणार आहे. या स्पर्धेचें उद्घाटन आमदार यशवंत माने यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी आमदार संजय मामा शिंदे हे राहतील तसेच या स्पधेर्साठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहेत.

22 जुलै रोजी प्रभागातील मनपाच्या रामवाडी प्रसूती ग्रहांमध्ये जेवढे प्रसूती होतील त्या बालकांच्या नावाने पाच हजार रुपये फिक्स डिपॉझिट म्हणून बँकेत ठेवण्यात येणार आहे. ही रक्कम अठरा वषार्साठी ठेवून त्याचे प्रमाणपत्र त्या बाळाच्या मातेला देण्यात येणार आहे. शासनाच्या वतीने विविध योजना राबविल्या जात आहेत. ज्या योजनांचा लाभ गरजूंना मिळतो अशा सर्व योजनांचा शुभारंभ प्रभागात करण्यात येणार आहे. याचा या प्रभागातील प्रत्येक गरजू व्यक्तीला लाभ होईल असे जाधव यांनी सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाबाबत आ. मोहिते-पाटील यांचा विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित

अकलूज (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर शहरात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत दोन हजार ९२ घरे मंजूर झालेली आहेत. गेल्या तीन वर्षापूर्वी ही योजना बंद आहे. बंद अवस्थेत असलेल्या प्रकल्प योजना पुन्हा सुरू करून गरीब लोकांना घरे मिळवून द्यावीत म्हणून आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केला असता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरपरिषदस्तरावर कार्यवाही सुरू असून लवकरच पंतप्रधान आवास योजनेचे काम पूर्ण होईल असे उत्तर दिले.

बेघर, कच्ची घरे आणि दारिर्द्ररेषेखालील झोपडपट्टीत राहर्णाया कुटुंबांना स्वतःचे पक्के घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने,देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली, मात्र पंढरपूर नगरपालिकेच्या जागेत पंतप्रधान आवास योजनेंतर्गत २ हजार ९२ घरांचा प्रकल्प उभारण्याचे काम गत तीन वर्षा पासून बंद असल्याने लाभार्थी घरा पासून वंचित राहिले आहेत. तसेच सदर गृहनिर्माण प्रकल्प नगरपालिकेच्या जागेवर आहे व नदीच्या पुररेषेत असून घरे खरेदीदाराच्या नावे होत नाही त्यामुळे बँकेकडून कर्ज मिळण्यास तांत्रिक अडचणी येत असल्याने अनेक लोकांनी घराचे बुकींग रद्द केले आहे त्यावर उपाययोजना करण्याची बाब आ.मोहिते पाटील यांनी सभागृहाच्या पटलावर आणली आहे. यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी नगरपालिकेची जागा हस्तांतर करताना शासनाची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे सांगुन सद्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सदर नगपालिकेच्या जागेवर झालेल्या कामाची किंमत ३७.८६ कोटी असून आतापर्यंत शासनाकडून ठेकेदारास ११.२६ कोटी रक्कम ठेकेदारास आदा केली आहे.कामाचे उर्वरीत देयके न मिळाल्याने ठेकेदाराने १ सप्टेंबर २०२१ पासून काम बंद केले होते.त्यानंतर ठेकेदाराने कामाची तयारी दर्शवली होती त्यामुळे काम पुन्हा सुरू करण्यासाठी नगरपरिषद निधीतून उर्वरीत देयकापैकी ६ कोटी रू देण्यात आले.त्यानंतरही ठेकेदारेने काम सुरू केले नाही व नगरपरिषदेस कायदेशीर नोटीस दिली आहे.या अनुषंगाने नगरपरिषद स्तरावर कार्यवाही सुरू असल्याची माहीती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

शिवसेनेच्या महाआरोग्य शिबिरास प्रचंड प्रतिसाद

हजारो गोरगरीब कामगारांना औषधोपचार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शिवसेना सोलापूर शहर आणि जिल्हातर्फे मोदी येथे आयोजित महाआरोग्य शिबिरास बुधवारी प्रचंड प्रतिसाद मिळाला. विविध तपासणी आणि औषधोपचारासाठी हजारो कामगारांनी दिवसभर गर्दी केली होती.

या शिबिराचे उद्घाटन शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आरोग्य विभागाचे उपसंचालक राधाकृष्ण पवार, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, शहर प्रमुख मनोज शेजवाल, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या शिबिर संयोजिका प्रा. ज्योती वाघमारे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख संयोजक प्रियदर्शन साठे, युवा सेना जिल्हाप्रमुख उमेश गायकवाड, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दत्ता सावंत, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले, महिला आघाडी शहर प्रमुख जयश्री पवार, वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख सुरज जम्मा, रविना राठोड, सुनंदा साळुंखे, मनीषा नलावडे, माधुरी कांबळे, ज्योतिबा गुंड, सागर शितोळे, ज्योतिबा गुंड, अर्जुन शिवसिंगवाले, सुजित खुर्द, तुकाराम मस्के, शिवाजी नीळ, जवाहर जाजू आदी उपस्थित होते.

यावेळी शिवसेना संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत म्हणाले, गोरगरीब, कष्टकरी कामगारांना आरोग्य सुविधा त्यांच्या घरापर्यंत मिळाव्यात या हेतूने शिवसेनेतर्फे महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरात कामगारांनी तपासणी करून औषधे घेतल्यानंतर पुढील उपचारही त्यांना देण्यात येणार आहेत. वर्षभर विविध ठिकाणी अशा शिबिरांचे आयोजन होणार असल्याचेही प्रा. सावंत यांनी यावेळी सांगितले.

शिवसेनेच्या महाआरोग्य शिबिरात दात, नाक, कान, घसा तपासणी, हाडांची संपूर्ण तपासणी, नेत्र तपासणी, मोतीबिंदू, लहान मुलांचे आजार, स्त्रीरोग, त्वचारोग, हृदय, ईसीजी, रक्तदाब, मेंदूच्या विविध तपासण्या, मधुमेह किडनी व लिव्हर अशा तपासण्या करण्यात आल्या.

महाआरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम भीम वाघमारे, आशिष परदेशी, दीपक पाटील, अभिजित काळे, गणेश तूपडोले, अल्फ्रान आबादीराजे, सय्यद म्हेत्रे, महेश कंपली, मनोज पोतराज, प्रद्युम्न वाघमारे, अभिषेक वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

४० डॉक्टर अन ७ हजार ४३६ कामगारांना लाभ

शिवसेनेच्या महाआरोग्य शिबिरात तब्बल ४० डॉक्टर आणि १२३ वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी रुग्णसेवा बजावली. महाराष्ट्र शासनाचा आरोग्य विभाग, महापालिका आरोग्य विभागाच्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी यात सहभाग नोंदवला. या शिबिराचा बुधवारी तब्बल ७ हजार ४३६ कामगारांनी लाभ घेतला.

झोपडपट्टी भागातील राज्यातील पहिलेच महाआरोग्य शिबिर

राज्याच्या आरोग्य विभागाच्या सहकार्यानें राज्यभर महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. मात्र बुधवारी मोदी येथे झालेले महाआरोग्य शिबिर हे झोपडपट्टी भागातील राज्यातील पहिलेच महाआरोग्य शिबिर ठरले.

आ. राम सातपुते यांच्या प्रयत्नाने एकशिवला होणार वीज उपकेंद्र

अकलूज (कटूसत्य वृत्त):- एकशिव ता माळशिरस येथील नवीन वीज उपकेंद्राचे काम गेल्या 5 वर्षापासून प्रलंबित होते सदर उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध होत नव्हती एकशिव येथील मुकुंद वाघमोडे यांनी 1 एकर जागा महावितरण ला दिली परंतु सदर जागेचा मोबदला मुकुंद वाघमोडे यांना मिळण्यासाठी महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून मंजुरी मिळत नव्हती व त्यामुळे एकशिव नवीन उपकेंद्राचे काम थांबले होते यामुळे दहिगाव वीज उपकेंद्रावरून वीज पुरवठा एकशीवला करण्यात येत होता अपुऱ्या दाबाने वीजपुरवठा मिळत असल्याने शेतकऱ्यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत होते. याबाबत एकशिवचे ग्रामस्थ व शेतकरी वारंवार आ राम सातपुते यांच्याकडे नवीन एकशिव उपकेंद्रा चे काम सुरू व्हावे म्हणून मागणी करत होते आ राम सातपुते यांनी महावितरणचे मुख्य कार्यालय मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक डॉ.लोकेश चंद्रा (भाप्रसे) व संचालक (संचलन) संजय ताकसांडे यांची भेट घेऊन तात्काळ उपकेंद्राचे काम सुरू करण्यास विनंती केली त्याप्रमाणे लवकरच वर्क ऑर्डर देऊन काम पूर्ण करण्याची लेखी सूचना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिल्याने या भागातील विजेची समस्या सुटणार असल्याने एकशिव ग्रामस्थांसह शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे .

VEERBHADRESHWAR EDUCATIONAL TRUST'S (R)
VEERBHADRESHWAR COLLEGE OF PHARMACY
RECOGNISED BY: GOVT OF KARNATAKA
APPROVED BY PHARMACY COUNCIL OF INDIA
HURRY UP
ADMISSIONS ARE OPEN FOR D.PHARMACY
LIMITED SEATS
ELIGIBILITY - PASS 10+2 SCIENCE EXAMS OR PUC WITH PCM OR PCB OR PCMB
■ QUALIFIED & EXPERIENCED LECTURERS ■ LIABRARY FACILITIES
■ WELL FURNISHED LAB ■ SMART CLASSROOMS ■ HOSTEL FOR BOYS & GIRLS
CONTACT
GUDDAMBE ELECTRONIC WARE HOUSE BUILDING, 2ND FLOOR, OPP. SGN PU.COLLEGE, GUBBI COLONY, BEHIND KEB OFFICE, M.G.ROAD, KALABURAGI - 585 105.
SPOT ADMISSION AT SOLAPUR ON EVERY SUNDAY
FOR MORE DETAILS
M. 9916334758
(CHAIRMAN)
08472 - 234758

जिल्ह्यातील मतदारांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याला सहकार्य करावे - जिल्हा निवडणूक अधिकारी शंभरकर

- **21 जुलै ते 21 ऑगस्ट 2023 या संपूर्ण महिनाभराच्या काळात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदारांच्या घरी भेटी देतील**
- **या उपक्रमामुळे जिल्हयातील मतदार याद्यांच्या शुध्दीकरणाचं आणि अद्ययावतीकरणाचं काम सुलभ होणार**

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि भारत निवडणूक आयोगाच्या संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यात 21 जुलै ते 21 ऑगस्ट 2023 या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओ घरोघरी भेट देऊन मतदारांची पडताळणी करणार आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व सुज्ञ मतदारांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले.

21 जुलै ते 21 ऑगस्ट 2023 या संपूर्ण महिनाभराच्या काळात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदारांच्या घरी भेटी देतील. आपल्या या भेटीमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मतदारांचे वैयक्तीक तपशील, पत्ता आणि छायाचित्रांची पडताळणी करतील, मयत आणि स्थालांतरीत मतदार, दुबार नोंदणी असलेले मतदार, मतदारांचाही शोध घेतील तसेच मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्ड जोडण्याची प्रक्रिया करतील. यासोबतच नव मतदार, तृतीयपंथी आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील मतदार, देहव्यवसाय करणाऱ्या महिला मतदारांचा शोध घेऊन त्यांची तसेच मतदार यादीत नाव नसलेल्यांचा शोध घेऊन त्यांची नोंदणी करण्याचं कामही या काळात केलं जाणार आहे, शंभरकर यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे सोलापूर जिल्हयातील मतदार याद्यांच्या शुध्दीकरणाचं आणि अद्ययावतीकरणाचं काम सुलभ होऊ शकणार आहे. तसेच हा उपक्रम म्हणजे आपण आपल्या मताधिकारापासून वंचित राहू नये याची सुनिश्चिती करण्याची नागरिकांसाठीची मोठी संधी असल्याची माहिती जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिली. त्यामुळेच जेंव्हा हे अधिकारी आपल्या घरी येतील तेव्हा नागरिकांनी आपलं स्वतःचं तसंच आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची नावं मतदार यादीत आहेत की नाहीत हे तपासून घ्यावं, ज्यांनी वयाची 18 वर्ष पूर्ण केली आहेत पण अजूनही मतदार नोंदणी केलेली नाही अशांची मतदार नोंदणी करुन घ्यावी, मतदार यादीतील आपले वैयक्तीक तपशील, पत्ता यात काही दुरुस्त्या असतील तर त्यासाठीचे अर्ज भरुन द्यावेत, लग्नानंतर नाव बदलेल्या स्त्री मतदारांनी आपली नांव बदलून घ्यावीत, स्थलांतरीत झालेल्यांनी नव्या पत्याची नोंद करुन घ्यावी असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

मतदारांच्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी होणार असल्यानं जिल्ह्यातील सर्व मतदारांनी त्यांच्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त सामान्य ज्ञान व निबंध लेखन स्पर्धा



क्रांतीसिंह नाना पाटील

कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त): भारतीय स्वातंत्र्यलढयामधील झुंझार नेते क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त संभाजी ब्रिगेड माढा तालुक्याच्या वतीने तालुकास्तरीय सामान्य ज्ञान व निबंध स्पर्धेचें आयोजन करण्यात आले आहे. ३ ऑगस्ट रोजी क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती असून त्यानिमित्ताने त्यांचे जीवनचरित्र सर्वांपर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जीवनावर आधारित २५ वस्तुनिष्ठ प्रश्नांसाठी २५ गुण, ६५ गुणांचे ६५ प्रश्न सामान्य ज्ञान , बुद्धिमत्ता चाचणी, मराठी, विज्ञान, गणित, साहित्य, चालू घडामोडी इत्यादी विषयांवर आधारित असतील. तर १० गुण क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जीवनावरील निबंध लेखनासाठी असतील. अशी एकूण १०० गुणांची ही सामान्य ज्ञान व निबंध लेखन स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धा लहान गट (इ. १ ली ते ७ वी), मोठा गट (इ.८ वी ते १२ वी) आणि खुल्या गटात घेतली जाणार असून या स्पर्धेतील प्रथम पाच क्रमांकांना अनुक्रमे दहा हजार, सात हजार,पाच हजार, तीन हजार, दोन हजार रुपये, सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र तसेच तीन उत्तेजनार्थ क्रमांकांना प्रत्येकी एक हजार रुपये बक्षीसे अशी एकूण विजयी होणाऱ्या स्पर्धकांना जवळपास एक लाख रुपयांची बक्षिसे आयोजकांच्या वतीने जाहीर करण्यात आली आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.अधिक माहितीसाठी ८९८३०६९१०४, ७७६८९२३३९६ या मोबाईल नंबर वर संपर्क करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

BAMS , MBBS , BHMS
NEET मध्ये कमी मार्क्स आहेत?
डॉक्टर व्हायचंय? ॲडमिशन घ्यायचे आहे?
घाबरू नका.. आम्ही करून देतो कमी बजेटमध्ये
BAMS , MBBS , BHMS..In कर्नाटक
(PCB 50%, NEET eligible)
आजच संपर्क करा व तुमचे ॲडमिशन कन्फर्म करा
मो. 98 23 58 99 05

जतला दुष्काळ जाहीर करण्यासाठी खासदार व पालकमंत्र्यांनी पुढाकार घ्यावा

हभप तुकाराम बाबा महाराज यांचे आवाहन

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- जत तालुका सध्या दुष्काळात होरपळत आहे. दीड महिने उलटून गेले तरी पावसाचा पत्ता नाही. सध्या पावसाचे वातावरण आहे, पाऊसही पडेल याचा अर्थ दुष्काळ हटला असे होत नाही. भर पावसाळ्यात टँकर सुरु आहेत, भविष्यात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होणार आहे तेव्हा खा. संजयकाका पाटील, राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुरेश खाडे यांनी जतला दुष्काळ जाहीर करावा, सवलती द्याव्यात यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन चिक्कलगी भुयार मठाचे मठाधिपती, श्री संत बागडेबाबा मानव मित्र संघटनेचे सर्वेसर्वा तुकाराम बाबा महाराज यांनी पत्रकार परिषदेत केले.

यावेळी श्री संत बागडेबाबा मानव मित्र संघटनेचे प्रशांत कांबळे, सिद्धू गुरव, भिमराया कांकणगी, मोसेन मणेर, श्याम मोरे, कुमार इंगोले वैभव जादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

जतचा दुष्काळ असो की कोरोना, एखाद्याचे घर जळाले असेल की नैसर्गिक आपत्ती श्री संत बागडेबाबा मानव मित्र संघटना कायम मदत नव्हे कर्तव्य म्हणून जतकरांच्या मदतीला धावून जाते. दुष्काळात राज्यात प्रथम खाजगी चारा छावणी काढली,कोरोना काळात तालुक्यातील ९० हुन अधिक गावात मदतीचा हात दिला. घरे जळाल्याच्या घटना घडल्या, अपघात झाले तेव्हा मानव मित्र संघटनेने काम केले असल्याचे सांगून तुकाराम बाबा महाराज म्हणाले, जतच्या पाण्यसाठीही श्री संत बागडेबाबा मानव मित्र संघटनेने रस्त्यावर उतरून आंदोलने केली आहेत. ६५ गावात पाण्यासाठी जनजागृती मोहीम, पाणी परिषदा घेत तहसिलदार ते मंत्रालय, आमदार ते मुख्यमंत्री यांच्याकडे जतच्या पाण्यासाठी, म्हैसाळचे पाणी जतला मिळावे म्हणुन पाठपुरावा केला. संख ते मुंबई मंत्रालय पाण्यासाठी ऐतिहासिक पायी दिंडी काढली. याच पायीदिंडीमुळे आजपर्यत जतला पाणी देतो म्हणणाऱ्यांचे बिंब फुटले. जतसाठी द्यायला पाणीच नाही असे लेखी पत्र मानव मित्र संघटनेला संबंधित विभागाने दिले. त्यानंतर जतला सहा टीएमसी पाणी वारणेतून देण्याचा निर्णय झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर विस्तारित म्हैसाळ योजनेला गती आली. १९३० कोटींचा निधी या योजनेला मंजूर झाला आहे.

जतमध्ये सध्या दुःकाळाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर मानव मित्र संघटनेने थेट जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. पालकमंत्री सुरेश खाडे यांची भेट घेत दुष्काळात मदत करा अशी विनंती केल्याचे सांगून तुकाराम बाबा महाराज म्हणाले जतला म्हैसाळचे पाणी सोडण्यात आले आहे. लवकरच हे पाणी जतच्या शिवारात दाखल होईल. एवढ्यावर आमचे समाधान होणार नाही की आमचा दुष्काळ हटणार नाही. जतला दुष्काळ जाहीर करून त्याच्या सवलती दिल्या, टंचाईतून म्हैसाळचे पाणी सोडले तरच आम्ही वाचणार आहोत तेव्हा त्यासाठी खासदार व पालकमंत्री यांनी शासन दरबारी प्रयत्न करून सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात जतला दुष्काळ जाहीर करावा ही मागणी पूर्ण करून घ्यावी हीच जतकरांची अपेक्षा असल्याचे तुकाराम बाबा यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

ॲट्रॉसिटी, पोक्सो, विनयभंगाच्या गुन्ह्यातून आरोपीची अटी शर्तीसह जामीनावर सुटका

कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):- माढा पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ३५४ अ, ३५४ ड,सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ४ व 12, (ॲट्रॉसिटी ॲक्ट),अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम 3(1)(ह)(i)(ii),3(2)(VA)अन्वये आरोपी ऋत्विक चव्हाण याच्यावर दिनांक 04 जून 2023 रोजी गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. उमा आखाडे यांच्यामार्फत बार्शी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात जामीन मिळण्याकरता अर्ज दाखल केला होता.यावर ॲड.उमा आखाडे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून 50 हजाराच्या जातमुचलक्यावर अटी शर्तीसह बार्शी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय यांनी आरोपीची जामीनावर सुटका केली. सदर प्रकरणात ॲड.आखाडे यांना ॲड. डी.ए. निकाळजे यांनी मार्गदर्शन केले तसेच ॲड.उषा पवार, ॲड. आम्रपाली वाघमारे,ॲड.वृक्षाली वाघमारे यांनी सहाय्य केले.

दैनिक कटूसत्य आणि वृत्तदर्पण न्यूज चॅनलच्या
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!
दैनिक सोलापूर कटूसत्य | वृत्तदर्पण
मे. सिद्धनाथ कन्स्ट्रक्शन
(गर्व्हमेंट कॉन्ट्रॅक्टर)
हॉटेल ब्ल्यू डायमंड, मिरज रोड,
सांगोला, जि. सोलापूर - ४१३३०७
शुभेच्छुकः-
प्रो.प्रा. बाळासाहेब एरंडे
संचालक शेतकरी सहकारी सूत गिरणी सांगोला
9423065643 / 9763156366